REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# 'महिलाच्या सामाजिक व आर्थिक बदलांमध्ये भूमिका' विशेष संदर्भः कराड व खंडाळा तालुका, जि. सातारा

प्रा. रणजीत प्रभाकर देशमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षि वि. रा. शिंदे कला महाविद्यालय,
नाना पेठ, पुणे.

## 1) सारांश :

समाजातील दुर्बल घटकातील महिलांना आर्थिक प्राप्तीकरिता अनेक स्वयंरोजगार योजना शासनाव्दारे राबविल्या जातात. या योजनांचा लाभ मुख्यतः समाजात असलेल्या निराधार, निरीश्रीत, परितक्त्या, विधवा, आर्थिकदृश्टया संकटात सापडलेल्या मागासलेल्या महिलांना स्वतःच्या कुटूंबात आर्थिक हातभार लावण्याकरिता केला जातो. तसेच महिलांना उद्योग व्यवसाय सुरु करण्याकरिता शासनामार्फत अनेक योजना राबवल्या जातात. त्यात आर्थिक अनुदान तसेच विविध व्यवसायासाठी प्रशिक्षण देणे इत्यादी उपक्रम आर्थिक व सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी केले जातात.

महिलांना सबल, सक्षम करुन त्यांचा आर्थिक स्तर उंचावून सर्व क्षेत्रात पुरुषांबरोबर समानता निर्माण करणे हे भारतीय राज्यघटनेचे व उद्दिष्टे आहे. म्हणून आजची स्त्री मनाने प्रगल्भ होत आहे. स्वतःला बदलते आहे. शिक्षण घेत असल्याने आत्मभान जागृत झालेल्या आजच्या महिला आपण आर्थिकदृश्टया स्वतंत्र असल पाहिजे याचे भान आले आहे. त्यामुळे शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही छोटे—मोठे उद्योग. व्यवसाय, बचत गटासारखे नानविध मार्ग आवलंबत आहेत. पण दुर्देवाने स्त्री जेवढया वेगाने बदलत आहे तेवढया वेगाने पुरुष स्वतंत्र देण्यास तयार नाही. म्हणून आजही महिलेकडे दुयमत्व येत आहे. म्हणून सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुक्यातील एकूण 100 महिलांचा सामाजिक व आर्थिक बदलांचा अभ्यास या ठिकाणी करण्यात आला आहे.

## 2. शोधसंज्ञा :—

महिला सक्षमीकरण, महिलांचा सहभाग, सामाजिक दर्जा, आर्थिक परिस्थिती, स्त्रीवाद, सामाजिक न्याय, निर्णय प्रक्रिया, समता

## 3.प्रस्तावना :—

1980 च्या दशकापासुन तिस—या जगातील राष्ट्रांना जागतिक बॅक, आंतरराष्ट्रीय नाणे निधीप्रमाणे रचनात्मक सुधारणा स्वीकारणे अपरिहार्य झाले आणि उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांच्या सापळयात ही राष्ट्र आडकली. परिणामी एकीकडे बहुराष्ट्रीय कंपन्यांना सर्वत्र मुक्तव्दार मिळाले तर दुसरीकडे सार्वजनिक क्षेत्रातील आपला वाआ कमी करुन सरकारांनी खाजगीकरणाला मुभा दिली. याचा एकत्रित परिणाम म्हणुन देशी उद्योग बंद पडू लागले. सरकारी नोक—यामध्ये, सार्वजनिक उद्योगांमध्ये कामगार कपात केली जाउ लागली. यातून बेकारी वाढली. असुरक्षित कंत्राटी पद्धतीच्या कामाचे प्रमाण वाढले. कामगारांना मिळणा—या वेतनात कपात होउ लागली. याचा सर्वाधिक



फटका महिला कामगारांना बसला. म्हणून संशोधनाचा आधार लक्षात घेता सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुक्यातील महिलांचा सामाजिक व आर्थिक बदला बाबतचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

महिलासाठी आवश्यक घटकांमध्ये आरोग्य, शिक्षण, माहिती, स्वयंविकासाकरिता आजन्म, शिक्षण, व्यावसायिक कौशल्य, तांत्रिक सहकार्य, भूमी व इतर प्रकारची मालमत्ता, विवाह बाबतचा निर्णय, घेण्याचा अधिकार इत्यादी बाबत समान व परिपूर्ण संधी देणे कल्याणकारी धोरणात समावेश होतो. तसेच आर्थिक स्थिती व स्थान (दर्जा) हे व्यक्तीच्या इतर क्षेत्रातील स्थिती व स्थानावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव टाकत असल्याने अन्य क्षेत्रात देखील महिला पुरुषांच्या तुलनेत दुयम दर्जाच स्वीकारावा लागतो. कोणत्याही परिस्थितीत ती आर्थिक दृष्टया स्वतःच्यापायावर उभी राहू शकेल. या विचाराला सर्व सामान्यपणे मान्यता मिळत गेली. परंतु कृतीत अद्याप पूर्णपणे उतरले गेल्याचे दिसत नाही. आजही 72 टक्के महिला आर्थिकदृष्टया परावलंबी आहेत. काही महिला पिता, पती किंवा मुलांवर अवलंबून आहेत. महिलांच्या सामाजिक श्रमावर आणि श्रमातून आलेल्या मिळकतीवर पुरुषांची मालकी आहे. यामुळे ग्रामीण महिला आर्थिक क्षेत्रातून बाहेर फेकल्या जाताना दिसतात. हेच या सदर संशोधनातून स्पष्ट होते की खंडाळा व कराड तालुक्यातील ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांच्या बाबतीत सामाजिक व आर्थिक दृष्टया दुयम दर्जा प्राप्त होताना दिसून येतो.

## 4. संशोधनाची उद्दिष्टे :–

1. महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. महिलांच्या उत्पन्नाच्या माध्यमाचा अभ्यास करणे.
4. महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती बदलण्यासाठी त्यांची भूमिका अभ्यासणे.
5. शासनाच्या व स्वयंरोजगाराच्या योजना विषयी महिलांचा दृष्टिकोन अभ्यास करणे.

## 6. संशोधन गृहितकृत्ये :–

प्रस्तुत संशोधन समस्याची उकल उद्दिष्टांच्या व गृहितकांच्या सहायाने करण्याचे प्रयोजन केले आहे. यासाठी महिलांच्या सामाजिक व आर्थिक बदलामध्ये भूमिकेचा अभ्यास पुढील गृहितकेच्या मांडणीतून केले आहे.

1. महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती खालावलेली आहे.
2. महिलांचे शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे.
3. महिला मोठया प्रमाणात शेतावर कामाला जातात त्यामुळे उत्पन्नाचा दर खालावलेला आहे.
4. शासनाच्या योजनांचा लाभ घेताना महिलांचे प्रमाण कमी आहे.

## 6. संशोधनाच्या मर्यादा :–

संशोधन विषयाला न्याय व महत्वपूर्ण बाबींचा सखोल अभ्यास करण्यासाठी केवळ सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुका याची मर्यादा असून ही या भौगोलिक क्षेत्रापुरतीच आहे. तसेच प्रस्तुत संशोधन हे महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीपुरते मर्यादित राहील. संशोधनासाठीची दुयम माहिती ही महिला व बाल विकास विभाग, संस्था यांच्याकडून मिळविण्यात आली आहे. प्रस्तुत विषयाचे अध्ययन करताना सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुक्यातील महिलांकडून प्रश्नावलीव्दारे प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली आहे.

## 7. संशोधन पध्दती :–

प्रस्तुत लघु संशोधनासाठी सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुक्यातील महिलांचा सामाजिक व आर्थिक बदलांमधील भूमिकाचा अभ्यासाची निवड सहेतुक नमुना किंवा उद्देशपूर्ण नमुना पध्दतीनुसार केला आहे.
तथ्य संकलनाचे स्त्रोत :–

1. निरीक्षण :– संशोधकाने महिलांच्या कामाच्या ठिकाणी जाउन त्यांच्या कामाची पध्दत, व्यवसायाचे वर्गीकरण, बोलण्याची पध्दत इत्यादीचे निरीक्षण केल्याने संशोधन विषया संदर्भाने आवश्यक माहिती गोळा करण्यात मदत झाली.
2. मुलाखत :– पूर्व नियोजित प्रश्नावलीच्या सहायाने निवडक महिलांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून तथ्य संकलनाच्या दृष्टीने आवश्यक माहिती व आकडेवारी मिळाली.
3. प्रश्नावली :– प्रस्तुत लघु संशोधनासाठी 100 महिलांकडून (50– कराड तालुका व 50– खंडाळा तालुका ) प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या या महिलाची निवड सहेतुक नमुना पध्दतीनुसार केलेली आहे.

## ब) संख्यिकीय विश्लेषण :–

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुयम स्त्रोताव्दारे आकडेवारी संकलीत केली आहे. त्याचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढताना सांख्यिकीय परिणामाचा वापर केला आहे. तालिणीकरण, सरासरी, वर्गीकरण, टक्केवारी इत्यादीचा वापर केला आहे. आवश्यक तेथे फोटो व नकाशाचा वापर केला आहे.

## 8. निष्कर्ष व विश्लेषन :–

### 1. शिक्षण :–

तक्ता क्र. 01 मध्ये अभ्यास क्षेत्रातील महिलांची शैक्षणिक स्थिती दर्शविलेली आहे. शिक्षण हा सामाजिक व आर्थिक बदलांमध्ये भूमिका हा महत्वपूर्ण घटक आहे. शिक्षणामुळे महिलांना विविध क्षेत्रातील माहिती जाणून घेणे. माहितीचा उपयोग करुन उद्योग–व्यवसाय सुरु करण्यासंदर्भात निर्णय घेणे शक्य होते.

**तक्ता क्र. 01 शैक्षणिक स्थिती**

| अ.क्र. | शिक्षणाचा स्तर | कराड तालुका | टक्केवारी | खंडाळा तालुका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निरक्षर | 10 | 20.00 | 05 | 10.00 |
| 2 | प्राथमिक | 09 | 18 | 10 | 20 |
| 3 | माध्यमिक | 20 | 40 | 25 | 50 |
| 4 | पदवी | 08 | 16 | 7 | 14 |
| 5 | पदव्युत्तर | 03 | 06 | 3 | 06 |
| | एकूण | 50 | 100 | 50 | 100 |

स्त्रोत – प्राथमिक तथ्य संकलन व क्षेत्रीय पाहणी

तक्त क्र. 01 मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे अभ्यास क्षेत्रातील महिलांची स्थिती शैक्षणिक दृष्टया फारशी सुधारलेली नाही. सातारा जिल्हयातील कराड व खंडाळा तालुक्यातील महिलांची शैक्षणिक स्थितीत माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. त्या पाठोपाठ कराड तालुक्यात निरक्षर महिलांचे प्रमाण जास्त आहे. त्या मानाने खंडाळा तालुक्यातील निरक्षण महिलांचे प्रमाण जास्त आहे. त्या मानाने खंडाळा तालुक्यात महिलांचे प्रमाण कमी आहे. तसेच प्राथमिक शिक्षणाचा स्तर देखील सामाजिक व आर्थिक बदलामध्ये महत्वाचा आहे. तो दोन्ही तालुक्यातील जवळ पास सारखा मुलाखतीस निरीक्षणात आलेला आहे जो महिलांच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात बदल होण्यास मदत होतो.

## 2) वयोगट :–

**तक्ता क. 02 महिलांचे वयोगटानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | वयोगट वर्ष | कराड तालुका | टक्केवारी | खंडाळा तालुका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 21 ते 30 वर्ष | 8 | 16 | 06 | 12 |
| 2 | 31 ते 40 वर्ष | 20 | 40 | 23 | 46 |
| 3 | 41 ते 50 वर्ष | 15 | 30 | 18 | 36 |
| 4 | 21 ते 30 वर्ष | 7 | 14 | 3 | 06 |
| 5 | 51 ते पुढे | | | | |
| | एकूण | 50 | 100 | 50 | 100 |

स्त्रोत :– प्राथमिक तथ्य संकलन व क्षेत्रीय पाहणी

तक्ता क. 2. मध्ये अभ्यास क्षेत्रातील महिलांचा सामाजिक व आर्थिक बदलाच्या भूमिकेत वयोगटाचे वर्गीकरण महत्वाचे आहे. कराड तालुका व खंडाळा तालुक्यातील वयोगट 31 ते 40 वर्षातील महिलाचे योगदान सर्वात जास्त आहे. त्याची सरासरी 40.00 ते 46.00 टक्के ही आहे. त्या पाठोपाठ वयोगट 41 ते 50 वयोगटातील महिला सामाजिक व आर्थिक बदलामध्ये महत्वाची भूमिका घेतात. या महिलांचा सहभाग जास्त दिसून येतो. वयोगट 51 ते पुढे वर्षातील महिला थोडया फार प्रमाणात आपली भूमिका सामाजिक कार्यात व आर्थिक परिस्थितीत दिसून येतात म्हणून वयोगट हा महत्वाचा तक्ता आहे.

## 3. व्यवसाय

**तक्ता क. 3 महिलांचे व्यवसायानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | व्यवसाय | कराड तालुका | टक्केवारी | खंडाळा तालुका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शेती | 16 | 32 | 21 | 42 |
| 2 | मजुरी | 10 | 20 | 8 | 16 |
| 3 | घरकाम | 12 | 24 | 10 | 20 |
| 4 | पशुपालन व दुग्ध | 6 | 12 | 8 | 16 |
| 5 | नोकरी | 2 | 4 | 1 | 2 |
| 6 | स्वयं रोजगार | 4 | 8 | 2 | 4 |
| | एकूण | 50 | 100 | 50 | 100 |

स्त्रोत :– प्राथमिक तथ्य संकलन व क्षेत्रीय पाहणी

तक्ता क. 03 मध्ये अभ्यास क्षेत्रातील महिलांचा सामाजिक व आर्थिक बलांच्या भूमिकेत व्यवसायाचे वर्गीकरण महत्वाचे आहे. खंडाळा व कराड तालुक्यात महिलांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेती व्यवसायावर आधारीत या महिलांचे रोजंदारी दिसून येते. तसेच या दोन्ही तालुक्यात मजुरीचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. मजुरीमध्ये शेत, व इतर व्यवसायातील मजुरी सुध्दा जास्त आहे. घरकामाचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. सरासरी 24. 00 ते 20.00 टक्के आहे. त्याच बरोबर पशुपालन व दुग्ध व्यवसाय, स्वयंरोजगार सुध्दा या महिला सामाजिक व आर्थिक बदलांच्या भूमिकेत महत्वाचे योगदान दिसून येते.

## 4. मासिक उत्पन्न पातळी व आर्थिक स्थिती

**तक्ता क. 04 महिलांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | व्यवसाय | कराड तालुका | टक्केवारी | खंडाळा तालुका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3000 ते 3500 | 03 | 06.00 | 04 | 08.00 |
| 2 | 3600 ते 4500 | 12 | 24.00 | 10 | 20.00 |
| 3 | 4600 ते 5500 | 09 | 18.00 | 15 | 30.00 |
| 4 | 5600 ते 6500 | 12 | 24.00 | 15 | 30.00 |
| 5 | 6600 ते 7500 | 08 | 16.00 | 02 | 04.00 |
| 6 | 6600 ते 7500 | 04 | 08.00 | 03 | 06.00 |
| 7 | 7600 ते पुढे | 02 | 04.00 | 01 | 02.00 |
| | एकूण | 50 | 100 | 50 | 100 |

स्त्रोत :— प्राथमिक तथ्य संकलन व क्षेत्रीय पाहणी.

तक्ता क्र. 04 मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे अभ्यास क्षेत्रातील पाहणीनुसार मासिक उत्पन्न व आर्थिक स्थिती कराड व खंडाळा तालुक्याची महत्वाची आहे. 3600 ते 5600 उत्पन्नामध्ये काम करणा—या महिलांचे प्रमाण जास्त आहे. तसेच त्या पाठोपाठ 3000 ते 3500 रु. मध्ये काम करणा—या महिलांचे दिसून येते. त्यांचे टक्केवारी 24.00 ते 20.00 ही आहे. कराड तालुक्यात 5600 हे प्रमाण खंडाळा तालुक्यातील महिलांच्या आर्थिक स्थिती पेक्षा जास्त असुन त्यांची टक्केवारी 16.00 ही आहे. तसेच थोडया फार प्रमाणात दोन्ही तालुक्यात बेरोजगारीचे प्रमाण सुध्दा दिसून येते. यामुळे वैयक्तिक किंवा सामूहिकरित्या कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावण्यासाठी या महिला सामूहिक शेती, दुग्ध व्यवसाय, भाजीपाला विक्री, शेळीपालन, शिवण काम, बांधकाम मजुरी व स्वतःच्या व्यवसायातून सक्रिय सहभाग नोंदवताना दिसून येतात. व आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करतात.

## 5. योजनाचा लाभ

**तक्ता क. 05 महिलांचे भासकीय योजनाचे लाभाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | योजनेचा लाभ | कराड तालुका | टक्केवारी | खंडाळा तालुका | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होय | 26 | 52.00 | 22 | 44.00 |
| 2 | नाही | 18 | 36.00 | 20 | 40.00 |
| 3 | माहित नाही | 06 | 12.00 | 08 | 16.00 |
| | एकूण | 50 | 100.00 | 50 | 100.00 |

स्त्रोत :— प्राथमिक तथ्य संकलन व क्षेत्रीय पाहणी

तक्ता क्र. 05 मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे अभ्यास क्षेत्रातील पाहणी नुसार सामाजिक व आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी महिलांचा शासकीय योजनांचा हातभार हा महत्वाचा विषय आहे. आर्थिक स्थितीत बदल होण्यासाठी शासनाकडून विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत या योजनांचा फायदा किंवा लाभ जवळपास दोन्ही तालुक्यातील महिलांनी घेतलेला आहे. त्यांच्या टक्केवारीचे प्रमाण 52.00 ते 44.00 टक्के हे आहे. त्या पाठोपाठ नाही घेतलेल्या महिलांचे प्रमाण सुध्दा 36.00 ते 40.00 टक्के मध्ये आहे. त्याचप्रमाणे या योजनाच माहित नाही किंवा सांगता सुध्दायेत नाही असे मत काही महिलांनी या क्षेत्रीय पाहणीच्या अभ्यास केला आहे.

## 8. उपाय व शिफारशी

1. निरक्षरता ही ब–यापैकी महिलामध्ये दिसून येते त्यासाठी सामाजिक सबलीकरणातून शिक्षण हा महत्वाचा घटक असल्याने साक्षरता विषयक प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे.
2. महिलांना इतर व्यवसायाबरोबर आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेती व्यवसायाषी निगडीत रोजगार संधी उपलब्ध करुन देणे व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
3. बॅकांचे हिशोब, आर्थिक व्यवहार इत्यादीचे काम महिलांना दिले पाहिजे.
4. घर, कुटुंब किंवा समाजात महिला–पुरुश भेदभाव न करता समान पातळीवर विकास घडवून आणावा व कोणालाही दुयम दर्जा देउ नये.

## 9. संदर्भ

1. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2012, जिल्हा सातारा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन
2. आगलावे प्रदीप, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर, फेब्रु. 2011
3. डॉ. लीला पाटील, स्त्री आणि भूमिका अंतर घरामंथन, ऑक्टो–डिसेंबर 2001, यशदा, पुणे
4. डॉ. विद्युत भागवत, स्त्री प्रश्नांची वाटचाल प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004
5. लोकराज्य– विकासात महिलांचे योगदान– सप्टेंबर 2008
6. योजना– स्त्री शिक्षणाला गती देण्याचे मार्ग– जून 2001
7. योजना– स्त्री सक्षमीकरण विशेषांक– ऑगस्ट 2001
8. Swati Dyahadoy and Anghd Tambe- Social Empoverment of women Women's Study Center. University of Pune 2009



**प्रा. रणजीत प्रभाकर देशमुख**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षि वि. रा. शिंदे कला महाविद्यालय, नाना पेठ, पुणे.**

LBP PUBLICATION